प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) व संयुक्त भागीदारी (Joint Venture) तत्वावरील प्रकल्पांतील घरकुलांच्या वितरणाचे धोरण निश्चीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रआयो/२०१९/प्र.क्र.२१/भाग-१/गृनिधो-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- २६ जून, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२/शिकाना, दि. ११/१/२०१८

२) शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.९५/गृनिधो-२, दि. ११/०९/२०१८.

३) शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१९/प्र.क्र.२१/गृनिधो-२, दि. ०८/०२/२०१९.

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री आवास योजनेस गती देण्याच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) व संयुक्त भागीदारी (Joint Venture) तत्वावरील योजना राबविण्याचा निर्णय उक्त अनुक्रमे संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. तसेच, उक्त योजनांमध्ये बांधण्यात येणा-या घरकुलांच्या वितरणाची कार्यपद्धती संदर्भाधीन दि.०८/०२/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये जाहीर करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत खाजगी विकासकांच्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) व संयुक्त भागीदारी (Joint Venture) अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांची खाजगी विकासकांकडून जाहिरात करुन लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यास व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर घरांचे वाटप करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

तथापि, सद्य:स्थितीत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्राप्त होणा-या अर्जांची संख्या मोठी असल्याने केवळ प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार घरकुलांचे वाटप करणे व्यवहार्य होत नसल्याचे लक्षात आल्याने याबाबतचे नेमके/स्पष्ट धोरण निश्चीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

<u>शासन निर्णय:-</u>

प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) व संयुक्त भागीदारी (Joint Venture) तत्वावरील प्रकल्पांतील घरकुलांचे वितरण हे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य अथवा लॉटरी पध्दतीने सोडत काढून करण्यास विकासकास परवानगी देण्यात येत आहे. यांतील जी प्रक्रिया सोईची असेल त्या प्रक्रियेचा अवलंब करुन घरकुलांचे वितरण करण्यास विकासकाला मुभा असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संकेताक २०१९०६२६१३०२३८७००९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA
MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=f4fd0ac26ad2a365a8e829907c5e76b911fed9b1b9e48cc2854c4b8a14b0d70c, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=befbb0ae84804c4da8d35abf2195ebb1dc727de9b0a094bea77f4ca6be5965db, ou=HOUSING DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2019.06.26 13:06:48 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन, (पत्राने)

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३) मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

४) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, म. वि. स., विधानभवन, मुंबई.

६) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, म. वि. स., मुंबई

७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

८) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व),मुंबई-५१.

९) व्यवस्थापकीय संचालक,शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्वसन प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१.

१२) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.

१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ, ३ रा मजला, साखर भवन, नरीमन पॉईट, मुंबई -२१.

१४) निवडनस्ती/गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.